# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/01/2023 (मंगळवार) सकाळ

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा दाखल

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील मच्छी मार्केट देशी दारू भट्टी जवळ सावनेर येथे दिनांक ०२/०१/२०२३ चे १७.००वा. ते दिनांक ०२/०१/२०२३ चे १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुरज नागोराव ढोके वय, ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. १६ झेंडा चौक पहीलेपार सावनेर हा मच्छी मार्केट सावनेर जवळील देशी दारूचे भट्टीत दारू पिण्याकरीता गेला असता यातील नमुद चारही आरोपी नामे— १) गनि उर्फ पलाश वासनिक, वय ३५ वर्ष, रा. नागपूर २) हर्षदिप गौरखेडे, वय २७ वर्ष, रा. सावनेर ३) बबलु तिवारी वय २९ वर्ष, रा. सावनेर ४) सुबोध मेश्राम वय २७ वर्ष रा. निळगाव बोरगाव तेथे आले व आरोपी क्र. १ याने जखमी फिर्यादीला ‘‘मला दारू पिण्याकरीता पैसे दे’’ फिर्यादीने त्यास पैसे देण्यास नकार दिल्याचे कारणावरून आरोपीतांनी संगनमत करून नमुद घटना वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ याने जखमी फिर्यादीला कवट्यात पकडून जिवे मारण्याचे उद्देशाने डोक्याचे भारावर देशी दारू चे भट्टीचे पायरीवर आपटले त्यामुळे त्याचे डोक्याला मार लागुन रक्त निघाले तसेच चारही आरोपीतांनी त्याला लाथा व हातबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०७, २९४, ५०४, ५०६, ३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मारूती मुळुक पोलीस स्टेशन सावनेर मो. नं. ९५५२५६४०४७ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०३ किमी अंतरावर टाकळघाट विक्तुबाबा देवस्थान ता. हिंगणा जि. नागपुर येथे दिनांक ०२/०१/२०२३ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे— सौ. सुधा प्रल्हाद टेंभुर्णे, वय ५५ वर्ष, रा. आवळे नगर टेका नाका नारी रोड नागपुर यांच्या घराच्या शेजारी राहणारे नामे— विजय वासनिक व इतर ०४ बाया मिळुन सर्व पिकअप गाडी ने राहते घरून टाकळघाट येथे विक्तुबाबा देवस्थानात पोहचले तिथे त्यांनी स्वयंपाक केला जेवण वैगरे करून दुपारी अंदाजे ०३.०० वा. मंदीरात दर्शनाकरीता गेले असता तिथे दर्शन करून अगरबत्ती लावत असतांना फिर्यादीचे साडी चे पिन पडल्याने फिर्यादीने आपल्या गळयाला हात लावला असता फिर्यादीच्या गळयामध्ये घातलेले सव्वा दोन तोळयाचे जुने वापरते सोन्याचे मंगळसुत्र कोणीतरी अज्ञात आरोपीने अंदाजे किंमती ३५,०००/—रू चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ASI डहाके पोस्टे एमआयडीसी बोरी मो. नं. ९८२३५१७४१२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**